शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई
GOVERNMENT DENTAL COLLEGE AND HOSPITAL, MUMBAI.
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डीमेलो मार्ग, छ.शि.म.ट.स्थानका शेजारी, फोर्ट, मुंबई – ४०० ००१
St. George's Hospital Compound, P.D'mello Road, Near CST Station, Fort, Mumbai - 400 001.
Phone - 022 - 22620668 Email: deangdch_mumbai@yahoo.com Website : www. gdcmumbai.edu.in


क्र.शादंमवरुमुं/विवि/दंततंत्रज्ञ/दंतआरोग्यक/मुलाखत/4021 /२०२६ दिनांक:-१३ /०८/२०२६

विषय:- दंततंत्रज्ञ व दंतआरोग्यक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता मुलाखत देण्याबाबत...

संदर्भ:- या कार्यालयाची विवि/ दंततंत्रज्ञ/दंतआरोग्यक / प्रवेश /वेबसाईट वरील ऑनलाईन जाहिरात दि. १५/०७/२०२६ ते दि. १४/०८/२०२६

आपणांस कळविण्यात येते की, दंततंत्रज्ञ व दंतआरोग्यक अभ्यासक्रमासाठी दिनांक **०१/०९/२०२६ मंगळवार** रोजी दंततंत्रज्ञ (Dental Mecanics Diploma Course) या अभ्यासक्रमासाठी सकाळी १०.३० वा ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत आणि दंतआरोग्यक ( Dental Hygienists Diploma Course) या अभ्यासक्रमासाठी दुपारी ०२.०० ते ०४.३० वाजेपर्यंत व्याख्यानगृह एल.टी. ३, मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णांलय, मुंबई येथे मुलाखतीसाठी विद्यार्थी स्वत: हजर रहावे, मुलाखतीच्या वेळी आपण अर्जा सोबत सादर केलेल्या / किंवा सादर न केलेल्या परंतू जरुरी असलेल्या सर्व मुळ प्रतीची तपासणी करण्यात येणार असल्याने अशी सर्व प्रमाणपत्रे आपण मुलाखतीच्या वेळी घेऊन यावीत. जेणे करुन प्रवेश प्रकिया सुरळीत रित्या पार पाडता येईल.

१) महाविद्यालय सोडल्याचा दाखला
२) १० वी परीक्षेची गुणपत्रिका व बोर्डाचे प्रमाणपत्र
३) १२ वि विज्ञान परीक्षेची गुणपत्रिका व बोर्डाचे प्रमाणपत्र
४) १२ वी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी लागलेला प्रयत्न प्रमाणपत्र (Attempt Certificate)
५) शारीरिकदृष्टया सक्षम असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र
६) जात व जात वैद्यता प्रमाणपत्र (मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता)
७) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे चालू (आर्थिक वर्ष २०२६-२०२७)प्रमाणपत्र आवश्यक आहे. (इ.मा.व., वि.ज.(अ), भ.ज.(ब.क.ड)
८) महाराष्ट्रात राहात असल्याचे अधिवास प्रमाणपत्र व राष्ट्रीयत्वाचा दाखला.
९) जे विद्यार्थी बारावी अथवा तत्सम परीक्षा (विज्ञान शाखा) उत्तीर्ण झाल्यानंतर काही वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज करीत असतील अशा विद्यार्थ्यांना हमीपत्र (Gap Affidavit) देणे आवश्यक आहे.
१०) आधार कार्ड.

मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल, प्रवेशित विद्यार्थ्यांना मुळ प्रमाणपत्रे कार्यालयात सादर करावी लागतील, **तसेच राहण्याकरीता आपणांस वसतीगृहात उपलब्ध होणार नाही. याबाबत आपण विचारणा करु नये. हे पत्र फक्त मुलाखतीकरिता देण्यात आलेले असून या पत्रावरुन आपणांस उपरोक्त प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्याबाबतची शाश्वती देण्यात येत नाही.** उपरोक्त प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड ही मुलाखतीस आलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीनुसार करण्यात येऊन त्यांची अंतिम यादी मुलाखत झाल्यानंतर संस्थेच्या सुचनाफलकावर लावण्यात येईल.

जर आपण दिनांक **०१/०९/२०२६ मंगळवार** रोजी अनुक्रमे सकाळी १०.३० वाजता व दुपारी ०२.०० वाजता मुलाखतीस हजर राहिला नाहीत तर आपले नाव गुणवत्ता यादीत समाविष्ट करण्यात येणार नाही. तसेच मुलाखती नंतर आल्यास आपले कोणतेही प्रतिवेदन विचारात घेतले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

Govt. Dental College & Hospital DEAN Mumbai

(डॉ. डिंपल पाडावे)
अधिष्ठाता,
Dean
Govt. Dental College & Hospital, Mumbai
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णांलय,
मुंबई ४००००१.

प्रति,
सोबत दिलेल्या दंततंत्रज्ञ (Dental Mecanics Diploma Course) व दंतआरोग्यक ( Dental Hygienists Diploma Course) मेरिट लिस्ट मधील सर्व विद्यार्थ्यांकरीता. सर्व विद्यार्थ्यांनी दि. ०१/०९/२०२६ **मंगळवार** रोजी दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे.

**Important Notice:-Applicants for hostel accommodation should note that hostel accommodation will be provided only if space is available. Otherwise, students will have to arrange accommodation at their own convenience.**